नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २६५ | Issue - 265 | वार शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ | Blow- Saturday Date 14 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या 'सेवा तीर्थ'चे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

### संकुलामध्ये पंतप्रधान कार्यालयासह राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (१३ फेब्रुवारी) अत्याधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या सेवा तीर्थ संकुलाचे उद्घाटन केले. या संकुलामध्ये पंतप्रधान कार्यालयासह (पीएमओ) राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय देखील आहे. नवीन संकुलात सेवा तीर्थच्या फलकाचे मोदींनी आज अनावरण केले. या संकुलाच्या भिंतीवर देवनागरी लिपीत नावे लिहिली असून त्याखाली 'नागरिक देवो भव' (नागरिक देवासारखे आहे) हे ब्रीदवाक्य कोरलेले आहे. पंतप्रधान कार्यालय रायसीना हिलवरील साउथ ब्लॉकमधून सेवा तीर्थ येथे हलवले जाईल, ज्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणी असलेली कॅबिनेट सचिवालय आणि राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयाची कार्यालये एकत्र येतील. या इमारतींची रचना ४-स्टार ऋछखक मानकांनुसार केली आहे आणि त्यात अक्षय ऊर्जा प्रणाली, जलसंवर्धन उपाय आणि डिजिटली एकात्मिक कार्यालये समाविष्ट आहेत. मोदींनी नवीन इमारतीचे उद्घाटन केले तेव्हा गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मनोहर लाल, पंतप्रधान कार्यालयातील राज्यमंत्री जितेंद्र सिंह आणि पंतप्रधान कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते. २०१४ पासून, मोदी सरकारने भारताच्या वसाहतवादी भूतकाळातील प्रतीकांपासून दूर जाण्यासाठी आणि मानसिकतेत बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने पावले उचलली आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यांनी निदर्शनास आणून दिले की पंतप्रधान कार्यालयाला आता सेवा तीर्थ असे नाव देण्यात येईल, केंद्रीय सचिवालयाच्या इमारतींना कर्तव्य भवन असे नाव देण्यात आले आहे आणि राजपथाचे कर्तव्य पथ असे नाव देण्यात आले आहे. त्याच भावनेने, पंतप्रधानांचे अधिकृत निवासस्थान असलेल्या रेसकोर्स रोडचे नाव बदलून लोक कल्याण मार्ग आणि राजभवन आणि राज निवास यांचे नाव अनुक्रमे लोकभवन आणि लोकनिवास असे करण्यात आले आहे.

दशकांपासून, सेंट्रल व्हिस्टा परिसरातील अनेक ठिकाणी पसरलेल्या तुटलेल्या आणि जुन्या पायाभूत सुविधांमधून अनेक प्रमुख सरकारी कार्यालये आणि मंत्रालये कार्यरत होती.

## विलीनीकरणाबाबत प्रस्ताव आल्यास भाजपला विश्वासात घेणे अनिवार्य : सुनील तटकरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चेमुळे राज्यातील राजकारण तापले असताना, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी भूमिका स्पष्ट करत, कोणताही विलीनीकरणाचा प्रस्ताव समोर आल्यास भाजपला विश्वासात घेणे अनिवार्य असल्याचे सांगितले. तसेच, शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केलेल्या दाव्याचाही त्यांनी तीव्र शब्दांत समाचार घेतला.

विलीनीकरणाच्या शक्यतेवर पत्रकारांशी बोलताना तटकरे म्हणाले की, विलीनीकरणाबाबत कोणताही प्रस्ताव किंवा विचार समोर आला, तर त्यावर पक्षपातळीवर चर्चा होईल. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पक्षाचे वरिष्ठ नेते त्यावर विचार करतील. मात्र, आम्ही एनडीएचा घटक पक्ष आहोत आणि एनडीएचा मुख्य पक्ष भाजप आहे. त्यामुळे कोणताही मोठा निर्णय घेताना भाजपला विश्वासात घेणे आवश्यक आहे. २०२३ मध्ये एनडीएमध्ये सहभागी होताना भाजपची अनुमती घेतल्याची आठवण करून देत, भविष्यातही आघाडीतील मुख्य पक्षाशी चर्चा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शशिकांत शिंदे यांनी पक्षाच्या मुखपत्रात लिहिलेल्या लेखात, अदृश्य शक्तींच्या कारवाया, धमक्या आणि खोट्या षडयंत्रांमुळे अजित पवारांना राष्ट्रवादीतून बाहेर पडून वेगळा गट स्थापन करावा लागल्याचा दावा केला होता. तसेच, झालेली चूक दुरुस्त करण्याच्या उद्देशाने ते मागील काही महिन्यांपासून प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले होते. या पार्श्वभूमीवर संताप व्यक्त करत तटकरे म्हणाले की, शिंदेंनी केलेले विधान अत्यंत गैर आहे. अजितदादांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर अशा प्रकारचे लिखाण करणे अनाठायी आहे. दादांनी घेतलेले निर्णय स्वच्छ मनाने आणि पक्षाच्या हितासाठीच होते. आता असे लिहून ते नेमके काय साध्य करू इच्छितात, त्यांचा हेतू काय आहे, हे समजत नाही. अजित पवार यांची भाजपबाबतची भूमिका पूर्वीपासूनच स्पष्ट होती, असा पुनरुच्चार करत तटकरे यांनी सांगितले की, २०१४, २०१६ आणि २०१७ मध्येही भाजपसोबत चर्चेचे प्रयत्न अंतिम टप्प्यात आले होते. २०१९ मध्येही भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सरकार राज्याला स्थिरता देऊ शकते, असे मत अजित पवारांनी स्पष्टपणे मांडले होते. त्यांनी ही भूमिका कधीही लपवून ठेवली नव्हती, असेही तटकरे यांनी नमूद केले.

## संसदेच्या दोन्ही सभागृहांचे कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लोकसभेतील अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा शुक्रवारी संपला. पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी सभागृहाचे कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब केले. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा आता ९ मार्चपासून सुरू होईल आणि २ एप्रिलपर्यंत चालेल. दरम्यान लोकसभेपाठोपाठ राज्यसभेचे देखील कामकाज ९ मार्चपर्यंत स्थगित करण्यात आले.

लोकसभेचे कामकाज सकाळी ११ वाजता सुरू झाले तेव्हा काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंह पुरी यांच्या राजीनाम्याची मागणी करत गोंधळ घातला. परिणामी, कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. दुपारी १२ वाजता कामकाज पुन्हा सुरू झाल्यावर, पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी जाहीर केले की अनेक सदस्यांनी स्थगन प्रस्तावासाठी सूचना सादर केल्या आहेत, ज्या फेटाळण्यात आल्या. त्यानंतर त्यांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचे नाव घेतले.

प्रधान यांनी त्यांच्या मंत्रालयाशी संबंधित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सभागृहाचे कामकाज सादर केले. यानंतर, केंद्रीय संस्कृती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी, कायदा आणि न्याय राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) अर्जुन राम मेघवाल, आयुष राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव, वाणिज्य आणि उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद, गृह राज्यमंत्री नित्यानंद राय आणि आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी त्यांच्या संबंधित मंत्रालयांशी संबंधित प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सभागृहात मांडले.

लोकसभेचे सरचिटणीस उत्पल कुमार सिंह यांनी माहिती दिली की औद्योगिक संबंध संहिता (सुधारणा) विधेयक, २०२६ राज्यसभेने १२ फेब्रुवारी रोजी कोणत्याही सुधारणांशिवाय मंजूर केले. हे विधेयक यापूर्वी लोकसभेत मंजूर करण्यात आले होते. त्यानंतर पीठासीन अधिकारी संध्या राय यांनी सभागृहाचे कामकाज ९ मार्चपर्यंत तहकूब केले

## ... तर मी राजीनामा देणार; नरहरी झिरवळ यांचे मोठे वक्तव्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : लाचलुचपत प्रतिबंध विभागाने गुरुवारी मुंबईत केलेल्या कारवाईने राज्यात खळबळ उडाली आहे. कारण एसीबीच्या कारवाईत गुरुवारी संध्याकाळी सहाच्या सुमारास अन्न व औषध प्रशासन विभागाच्या क्लार्कला अटक करण्यात आली. राजेंद्र ढेरंगे असे या क्लार्कचे नाव असून ३५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना त्याला पकडण्यात आलं. मंत्रालयात दुसऱ्या मजल्यावर ही कारवाई करण्यात आली. ज्या खात्यातील क्लार्कवर ही कारवाई करण्यात आली त्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री छ्रीहरीळ नळ्रीुरश्र हे या घटनेमुळे अडचणीत आले असून आज त्यांनी याप्रकरणी आपली बाजू मांडत लाच घेणाऱ्या क्लार्कवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असं म्हटलं आहे.

तुमच्या मंत्र्यालयातील हा क्लार्क होता, तर ही जबाबदारी तुमच्यावरही येत नाही का? असा प्रश्न आज नवी दिल्ली इथं पत्रकारांकडून मंत्री नरहरी झिरवळ यांना विचारण्यात आला. त्यावर झिरवळ म्हणाले की, ही जबाबदारी आहेच, नाही म्हणून चालणार नाही. त्याने जे कृत्य केलंय, त्याला आम्ही पाठीशी घालणार नाही, हे मी खात्रीने तुम्हाला सांगतो. या प्रकरणाची चौकशी व्हावी. चौकशीत जर या लाच प्रकरणाची लिंक माझ्यापर्यंत जोडली गेली, तर मी मंत्रिपदाचा राजीनामा देईन, असं झिरवळ यांनी स्पष्ट केलं आहे.



जो गैरप्रकार झालाय, त्याला आपण कसल्याही प्रकारे पाठीशी घालणार नाही. जी शासकीय किंवा कायदेशीर बाब असेल त्याचा त्याला जाब द्यावा लागेल. कारकून म्हणून त्याचं कार्यालय बाहेर होतं. मंत्री किंवा मंत्र्यांचे खासगी सचिव आणि विशेष कार्य अधिकारी यांच्याशी त्याच्या तसा थेट संबंध नाही. माझं कार्यालय सील केल्याची माहिती मला तुमच्याकडूनच मिळत आहे. पण मला असं वाटत नाही की मंत्रालयातील माझं कार्यालय सील केलं गेलं असावं. मी आज दिल्लीवरून मुंबईला जाणार आहे. मुंबईतगेल्यानंतर मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेईन आणि या सर्व प्रकरणाविषयी त्यांच्यासोबत चर्चा करेन, असं म्हणत छ्रीहरीळ नळ्रीुरश्र यांनी लाच प्रकरणात आपली भूमिका मांडली आहे.

रोहित पवारांची मागणी, केंद्रीयमंत्र्यांनी लावली एएआयबी चौकशी

## अजित पवारांच्या विमान अपघाताचे पत्ते उलगडणार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या संदर्भात केंद्रीय उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी एएआयबीची चौकशी लावली आहे. एएआयबी ही स्वतंत्र चौकशी संस्था असून ती केंद्रीय हवाई उड्डान मंत्रालयाच्या अंतर्गत येत नाही. या चौकशी यंत्रणेला जगातील कोणत्याही चौकशी यंत्रणेची मदत मागून या अपघाताची चौकशी करता येते अशी तरतूद आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन गंभीर आरोप केले आहेत. तसेच, या घटनेची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चौकशी झाली पाहिजे, अशीही मागणी त्यांनी केली होती. त्यानुसार, आता चौकशी सुरू झाल्याचे दिसून येते.

राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री असताना एएआयबीची स्थापन करण्यात आली होती. आपल्या देशात विमान दुर्घटनेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी करण्याकरिता संघटना पाहिजे म्हणून या चौकशी समितीची निर्मिती करण्यात आली होती. दुर्घटनेतील सत्य समोर आलं पाहिजे आणि अपघातसंदर्भाने मुळात दोनच गोष्टी या चुकीच्या असू शकतील. एकतर वैमानिकाचा दोष किंवा विमानाचा दोष. त्यामुळे अपघाताची सगळी चौकशी झाली पाहिजे अशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. या पलीकडे कोणती चौकशी करण्याची समिती असेल त्याची सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मागणी करेन. पण, एएआयबीला चौकशीचे सर्वाधिकार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी एका वृत्तवाहिनीला दिली. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून आमदार रोहित पवार यांच्याकडून सातत्याने अपघात की घातपात या अनुषंगाने चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केली जात असताना आता ही चौकशी सुरू झाल्याचे समोर आलं आहे.

दरम्यान, अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला की घातपात यावरुन शंका उपस्थित होत आहेत. राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून सातत्याने या विमान अपघाताच्या सखोल चौकशीची मागणी केली जात आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या चौकशीच्या मागणीसंदर्भात नागरी उड्डाण मंत्र्यांना पत्र लिहिले होते. आता, केंद्रीय मंत्रालयाकडून या विमान अपघाताची एएआयबी चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे, आमदार रोहित पवारांच्या सातत्याच्या मागणीनंतर दुर्घटनेची सखोल चौकशी सुरू झाल्याचं दिसून येतं.

## 'नरेगा' अंतर्गत मातोश्री ग्रामसमृद्धी पाणंद रस्त्यांना मोठा दिलासा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : ग्रामीण भागातील शेतमाल वाहतूक अधिक सुलभ आणि सुरक्षित करण्यासाठी 'नरेगा' अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या 'मातोश्री ग्रामसमृद्धी' पाणंद रस्ता कामांवर असलेली 'दहा कामांची मर्यादा' आता लवकरच हटवण्यात येणार आहे. केंद्र सरकारने या प्रस्तावाला तत्त्वतः मंजुरी दिली असून, यामुळे कामांना गती मिळणार असल्याचे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी सांगितले.

राज्यात मागील काही महिन्यांपासून एका गावात दहापेक्षा अधिक कामे सुरू करण्यास मर्यादा असल्याने अनेक ठिकाणी पाणंद रस्त्यांची कामे प्रलंबित होती. या पार्श्वभूमीवर रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. केंद्रीय मंत्री चौहान यांनी पाणंद रस्त्यांच्या कामांना तातडीने गती देण्यास होकार दर्शवला असून राज्यात लागू असलेली मर्यादा लवकरच पूर्णपणे उठवली जाईल, असे आश्वासन यावेळी दिले.

या निर्णयामुळे राज्यभर पाणंद रस्त्यांची कामे सुरळीतपणे सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असून ग्रामीण अर्थव्यवस्थेला यामुळे चालना मिळणार आहे. शेतकऱ्यांना शेतमाल बाजारपेठेत जलद आणि. सुरक्षितरित्या पोहोचवता येईल, वाहतूक खर्च कमी होईल तसेच गावांच्या दळणवळण व्यवस्थेत लक्षणीय सुधारणा होईल. मातोश्री ग्रामसमृद्धी उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावण्यास हा निर्णय महत्त्वाचा ठरेल असा विश्वास रोहयो मंत्री भरत गोगावले यांनी व्यक्त केला.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ 

## संपादकीय....

### एएआयबीचा तपास

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या संदर्भात केंद्रीय उड्डाण मंत्री राम मोहन नायडू यांनी एएआयबीची चौकशी लावली आहे. एएआयबी ही स्वतंत्र चौकशी संस्था असून ती केंद्रीय हवाई उड्डान मंत्रालयाच्या अंतर्गत येत नाही. या चौकशी यंत्रणेला जगातील कोणत्याही चौकशी यंत्रणेची मदत मागून या अपघाताची चौकशी करता येते अशी तरतूद आहे. त्यामुळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी दोन दिवसांपूर्वी पत्रकार परिषद घेऊन गंभीर आरोप केले आहेत. तसेच, या घटनेची राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चौकशी झाली पाहिजे, अशीही मागणी त्यांनी केली होती. त्यानुसार, आता चौकशी सुरू झाल्याचे दिसून येते. राष्ट्रवादीचे नेते प्रफुल पटेल केंद्रीय हवाई उड्डाण मंत्री असताना एएआयबीची स्थापन करण्यात आली होती. आपल्या देशात विमान दुर्घटनेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी करण्याकरिता संघटना पाहिजे म्हणून या चौकशी समितीची निर्मिती करण्यात आली होती. दुर्घटनेतील सत्य समोर आलं पाहिजे आणि अपघातसंदर्भाने मुळात दोनच गोष्टी या चुकीच्या असू शकतील. एकतर वैमानिकाचा दोष किंवा विमानाचा दोष. त्यामुळे अपघाताची सगळी चौकशी झाली पाहिजे अशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मागणी आहे. या पलीकडे कोणती चौकशी करण्याची समिती असेल त्याची सुद्धा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मागणी करेन. पण, एएआयबीला चौकशीचे सर्वाधिकार आहेत, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी एका वृत्तवाहिनीला दिली. त्यामुळे, गेल्या काही दिवसांपासून आमदार रोहित पवार यांच्याकडून सातत्याने अपघात की घातपात या अनुषंगाने चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी केली जात असताना आता ही चौकशी सुरू झाल्याचे समोर आलं आहे. दरम्यान, अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला की घातपात यावरुन शंका उपस्थित होत आहेत. राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून सातत्याने या विमान अपघाताच्या सखोल चौकशीची मागणी केली जात आहे. विशेष म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या चौकशीच्या मागणीसंदर्भात नागरी उड्डाण मंत्र्यांना पत्र लिहिले होते. आता, केंद्रीय मंत्रालयाकडून या विमान अपघाताची एएआयबी चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. त्यामुळे, आमदार रोहित पवारांच्या सातत्याच्या मागणीनंतर दुर्घटनेची सखोल चौकशी सुरू झाल्याचं दिसून येतं.

# 'मुंबई क्लायमेट वीक' : हवामान कृतीसाठी भारताचा जागतिक मंच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबईत होणारा भारतातील पहिला 'क्लायमेट वीक' हा हवामान बदलावर केवळ चर्चा न करता प्रत्यक्ष कृतीकडे नेणारा मंच ठरणार आहे. शासन, उद्योग, तज्ज्ञ, युवक आणि नागरिक यांना एकत्र आणत हा उपक्रम ग्लोबल साऊथ देशांसाठी हवामान नेतृत्वाचा नवा नमुना मांडणार आहे.

अन्नसुरक्षा, स्वच्छ ऊर्जा आणि शहरी शाश्वतता या तीन महत्त्वाच्या क्षेत्रांवर भर देत नवकल्पना, युवक सहभाग आणि लोकाभिमुख कार्यक्रम द्वारे हवामान कृती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. हवामान बदलावर उपाय म्हणजे सामूहिक जबाबदारी आणि तातडीची कृती हा यानिमित्ताने मुंबईतून दिला जाणारा संदेश स्पष्ट आहेष्ठ.

हवामान बदल ही भविष्यातील किंवा केवळ वैज्ञानिक चर्चेची गोष्ट राहिलेली नाही. पूर, उष्णतेच्या लाटा, अनियमित पाऊस, अन्नसुरक्षेची आव्हाने या सगळ्याचा थेट परिणाम आपल्या दैनंदिन आयुष्यावर होत आहे. अशा पार्श्वभूमीवर मुंबईत १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ दरम्यान होणारा मुंबई क्लायमेट वीक हा भारतासाठी आणि विशेषत: ग्लोबल साऊथ देशांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

हा केवळ परिषदांचा कार्यक्रम नाही, तर संवादातून प्रत्यक्ष कृतीकडे जाण्याचा प्रयत्न आहे आणि त्याचे वैशिष्ट्य म्हणजे शासन, उद्योग, तज्ज्ञ, युवक आणि सामान्य नागरिक यांना एकाच मंचावर आणणे हे आहे.प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या वतीने हा उपक्रम आयोजित करण्यात आला असून महाराष्ट्र शासनाचा पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या सहकार्याने हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमामुळे मुंबईला भारत तसेच इतर ग्लोबल साऊथमधील शहरांसाठी हवामान उपाययोजनांची प्रयोगशाळा होणार आहे.

**हवामान चर्चेपासून प्रत्यक्ष उपायांकडे**

मुंबई क्लायमेट वीकचा उद्देश केवळ हवामान बदलावर चर्चा करणे नसून, प्रत्यक्ष अंमलात आणता येतील असे उपाय शोधणे आणि त्यांना गती देणे हा आहे. मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे तीन दिवस मुख्य कार्यक्रम होतील, तर मुंबई शहरभर महाविद्यालये, समुदाय केंद्रे आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध उपक्रम राबवले जातील. त्यामध्ये नेतृत्व संवाद, विविध विषयांवरील ट्रॅक्स, श्रें इनोव्हेशन चॅलेंज, यूथ ग्रीन इनोव्हेशन चॅलेंज तसेच उपाययोजनांचे प्रदर्शन क्षेत्र आदींचा समावेश असणार आहे.

''हब-अँड-स्पोक'' रचना म्हणजे एकाच वेळी धोरणात्मक चर्चा आणि लोकसहभाग दोन्ही गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न या निमित्ताने होणार आहे. हवामान कृती ही केवळ सरकारची जबाबदारी नसून समाजाच्या प्रत्येक घटकाचा सहभाग आवश्यक आहे, हा संदेश यातून दिला जाणार आहे.

मुख्य केंद्रातील पहिल्या दिवशी अर्थशॉट प्राईज या आंतरराष्ट्रीय उपक्रमाचे विशेष सत्र होणार असून, या सत्रात निसर्ग, अन्न प्रणाली आणि मानव यांवर लक्ष केंद्रित केले जाईल. केन्सिंग्टन पॅलेस (यूके) येथील पथकाच्या मार्गदर्शनाखाली होणारा हा उपक्रम प्रिन्स विल्यम यांच्या संकल्पनेतून साकारलेला असून, मुंबई क्लायमेट वीकमध्ये तो प्रथमच आणि विशेष स्वरूपात सादर केला जाणार आहे. या कार्यक्रमात ग्लोबल साऊथमधील हवामान नवोन्मेषक, प्रत्यक्ष उपाययोजना राबवणारे कार्यकर्ते तसेच भारतातील अग्रगण्य व्यक्ती सहभागी होणार असून, मोठ्या प्रमाणावर जनसहभाग वाढवण्याचा उद्देश आहे. याच कालावधीत विविध महाविद्यालये, वसाहती आणि सांस्कृतिक संस्थांमध्ये विविध कार्यक्रम होणार असून, त्यात रोड शो, कला व माध्यम उपक्रम तसेच सस्टेनेबिलिटी मेला यांचा समावेश आहे. या उपक्रमांद्वारे हवामान कृती दैनंदिन जीवनाचा भाग बनवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

वातावरण हे मुंबई क्लायमेट विकचे नागरिक संवाद व्यासपीठ असून, याद्वारे नागरिकांना त्यांच्या हवामानविषयक मतांची मुक्त आणि अनफिल्टर्ड मांडणी करता येणार आहे. भाषणे, कविता, कथा, गाणी आणि इतर सर्जनशील माध्यमांद्वारे हवामानाशी संबंधित दैनंदिन अनुभव आणि मते मुंबई क्लायमेट वीकच्या केंद्रस्थानी आणल्या जाणार आहेत.

ग्लोबल साऊथचा आवाज

हवामान बदलाचा सर्वाधिक परिणाम विकसनशील देशांवर होतो, परंतु उपाययोजनांच्या चर्चेत त्यांना कमी महत्त्व मिळते. मुंबई क्लायमेट वीक ग्लोबल साऊथ देशांसाठी एक नेतृत्व मंच उपलब्ध करून देणार आहे. मुंबई क्लायमेट वीक व्यापक भागीदारीच्या माध्यमातून राबवण्यात येत आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक हा मुख्य भागीदार आहे. डेलॉईट ही धोरणात्मक ज्ञान भागीदार संस्था आहे. टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीआयएसएस) आणि आयआयटी बॉम्बे हे शैक्षणिक भागीदार आहेत.

एव्हरसोर्स कॅपिटल, इंडिया क्लायमेट कोलॅबोरेटिव्ह, शक्ती सस्टेनेबल एनर्जी फाउंडेशन, वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट (WRI) इंडिया, क्लायमेट ग्रुप, सी ४०, महिंद्रा ग्रुप, इंडियन मर्चट्स चेंबर यांसारख्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांचा सहभाग असणार आहे. युनिसेफच्या युवाह (धींथररह!) या उपक्रमाद्वारे युवक सहभाग भागीदार असणार आहे.

या उपक्रमात ३० हून अधिक देशांतील प्रतिनिधी, आंतरराष्ट्रीय संस्था, वित्तीय संघटना आणि उद्योग क्षेत्रातील नेते सहभागी होणार आहेत. बिल गेट्स, हिलरी क्लिंटन यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योगपती आणि नेते यांची उपस्थिती या कार्यक्रमाला जागतिक महत्त्व देते. यातून भारत हवामान विषयक नेतृत्व केवळ धोरण पातळीवर नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून दाखवण्याचा प्रयत्न करत आहे.

**तीन महत्त्वाचे केंद्रबिंदू**

मुंबई क्लायमेट वीकची संकल्पना तीन प्रमुख क्षेत्रांवर आधारित आहे:

१. अन्नप्रणाली (Food Systems) – हवामान बदलाचा शेती आणि अन्नसुरक्षेवर होणारा परिणाम लक्षात घेऊन टिकाऊ शेती आणि पोषण यावर भर.

२. ऊर्जा संक्रमण (एपशीसू ढीरपळींळेप) – पारंपरिक ऊर्जेऐवजी स्वच्छ आणि नवीकरणीय ऊर्जेकडे वाटचाल.

३. शहरी शाश्वतता (णीलरप ठशीळश्रळशपलश) शहरांना हवामान बदलाच्या परिणामांपासून सुरक्षित आणि सक्षम बनवणे.

हे तीनही घटक भारताच्या विकासाच्या केंद्रस्थानी आहेत, त्यामुळे हा कार्यक्रम केवळ पर्यावरण विषयापुरता मर्यादित राहणार नाही.

**नवकल्पना आणि युवकांची भूमिका**

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. हवामान समस्यांवर नवे उपाय शोधण्यासाठी नॅशनल स्टॉक एक्स्चेंजच्या सहकार्याने 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. स्टार्टअप, संशोधक आणि सामाजिक संस्था हे यामध्ये सहभागी होऊन आपले उपाय सादर करणार आहेत. युवकांसाठी स्वतंत्र हरित नवकल्पना स्पर्धा असेल. युनिसेफच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष चर्चेत आणि उपाययोजनांमध्ये सहभागी केले जाणार आहे. भविष्यातील हवामान नेतृत्व घडवण्यासाठी हा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो.

**विज्ञान, संस्कृती आणि नागरिक सहभाग**

मुंबई क्लायमेट वीकमध्ये नवोन्मेष हा केंद्रस्थानी असणार आहे. या सप्ताहात सार्वजनिक व्याख्याने, कला-संस्कृती कार्यक्रम, चित्रपट प्रदर्शन आणि नागरिक कार्यशाळा आयोजित केल्या जातील. हवामान बदल हा केवळ वैज्ञानिक विषय नसून सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नही आहे, हे यातून अधोरेखित होते.

१८ फेब्रुवारी रोजी विशेष सत्रात भारताचे अंतराळवीर राकेश शर्मा आणि अंतराळवीर शुभांशु शुक्ला (दोघेही अशोक चक्र पुरस्कारप्राप्त) शालेय विद्यार्थ्यांशी तसेच जागतिक नेतृत्वाशी संवाद साधणार असून, अंतराळ संशोधन, विज्ञान आणि हवामान जबाबदारी यांचा परस्पर संबंध अधोरेखित केला जाणार आहे.

युनिसेफ इंडिया आणि यु वाह (YuWaah) यांच्या भागीदारीत युवकांसाठी विशेष उपक्रम राबवले जाणार असून, १६ ते २४ वयोगटातील युवकांचा सहभाग असणार आहे. अन्न प्रणाली, ऊर्जा संक्रमण आणि शहरी लवचिकता या विषयांवरील युवकांच्या नवोन्मेषांचे प्रदर्शन मुंबई क्लायमेट वीकमध्ये करण्यात येणार आहे.

हवामान कृतीचे नवे मॉडेल

मुंबई क्लायमेट वीक ही भारत आणि ग्लोबल साऊथ देशाच्या नेतृत्वाखालील, नागरिक-केंद्रित हवामान कृतीचे नवे मॉडेल ठरणार आहे. मुंबई क्लायमेट वीक हा सार्वजनिक-खासगी-नागरिक भागीदारीवर आधारित उपक्रम आहे. यामधून शहर पातळीवर हवामान उपाययोजना राबविण्याचा भारतीय नमुना साकारणार आहे. जर या मंचातून ठोस भागीदारी, निधी आणि धोरणात्मक निर्णय घडले, तर तो भारत आणि ग्लोबल साऊथ देशांसाठी दिशादर्शक ठरू शकतो. हवामान बदल हा भविष्यातील नव्हे, तर वर्तमानाचा प्रश्न आहे. मुंबई क्लायमेट वीक हा या वास्तवाला सामोरे जाण्याचा सामूहिक प्रयत्न असून जिथे कल्पना, विज्ञान, उद्योग आणि नागरिक सहभाग एकत्र असेल. हवामान कृती ही सर्वाची जबाबदारी आहे, आणि बदलाची सुरुवात आजपासूनच करावी लागेल, हा संदेश मुंबई क्लायमेट विकच्या माध्यमातून जगभरात जाईल हे नक्की.

**– नंदकुमार बलभीम वाघमारे**
**वरिष्ठ सहायक संचालक (माहिती)**
**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई**

# महाराष्ट्रातील गुंतवणूकदारांच्या फसवणुकीचा तपास केंद्रीय संस्थांमार्फत करा! खासदार नीलेश लंके यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर : महाराष्ट्रातील गुंतवणूकदारांच्या कोट्यवधी रुपयांच्या फसवणूक प्रकरणाचा तपास ईडी, सीबीआय यासारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय द्यावा तसेच भविष्यात अशा फसव्या योजनांना आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) खासदार नीलेश लंके यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची दिल्लीमध्ये भेट घेऊन केली आहे. खासदार लंके यांनी यापूर्वी पंतप्रधानांच्या भेटीत त्यांना रायगड किल्ल्याच्या भेटीचे निमंत्रण दिले होते. आता गृहमंत्री शहा यांची भेट घेऊन गुंतवणूकदारांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत जिल्ह्यातील गुंतवणूकदारांचा प्रश्न प्रचाराचा बनला होता. याच मुद्द्यावरून पालकमंत्री राधाकृष्ण विखे व त्यांचे चिरंजीव माजी खासदार सुजय विखे यांनी खासदार लंके यांचे नाव न घेता त्यांच्याविरुद्ध टीकेची झोड उठवली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महापालिकेच्या निवडणूक प्रचार सभेत गुंतवणूकदारांच्या फसवणुकीचा तपास सीबीआयकडे सोपवण्यासाठी केंद्रीय गृहमंर्त्याची भेट घेणार असल्याचे जाहीर केले होते.

खासदार लंके यांनी यासंदर्भात केंद्रीय गृहमंत्री शहा यांना निवेदन दिले. राज्यात गुंतवणूकदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली. ज्यादा परताव्याचे आमिष दाखवून नागरिकांकडून गुंतवणूक करून घेतल्यानंतर पैसे परत न देणे, धमकावणे, आर्थिक गैरव्यवहार केल्याचे आरोप संबंधित संस्थांवर आहेत. या प्रकरणाची ईडी, सीबीआय यासारख्या केंद्रीय तपास संस्थांमार्फत सखोल चौकशी करून गुंतवणूकदारांना न्याय द्यावा अशी मागणी करण्यात आली आहे. याबरोबरच पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी कार्यालय दिल्लीतील 'सेवा तीर्थ' या नवीन इमारतीत स्थलांतर झाल्यानंतर लोकप्रतिनिधींना तेथे अधिकृत कामासाठी प्रवेश नाकारला जात आहे, त्यामुळे गंभीर आजारी नागरिकांच्या मदत प्रकरणांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत आहे. लोकप्रतिनिधींना त्या विभागात प्रवेश देण्याच्या स्पष्ट सूचना द्याव्यात, अशा मागणीची निवेदनही लंके यांनी गृहमंर्त्यांना दिले.

याबरोबरच पुणे येथील गुन्हा शाखेच्या युनिट-१३ (गुप्तचर विभाग) कामकाज न्यायालयाच्या आदेशानुसरही अद्याप सुरू झालेले नाही. तसेच तेथील १७० कर्मचाऱ्यांचे १८ महिन्यांचे वेतन थकीत राहिले आहे. परिणामी त्यांच्या कुटुंबावर गंभीर आर्थिक संकट ओढावले आहे. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार युनिट- १३ चे कामकाज तातडीने सुरू करून सर्व थकीत वेतन अदा करावे, अशीही मागणी खासदार लंके यांनी केली आहे.

# 'काम न करणाऱ्या आमदार, खासदारांना घरी बसविण्याचा अधिकार द्या', राघव चड्ढा यांची राज्यसभेत मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : 'जनतेची कामे न करणाऱ्या पुढाऱ्यांना घरी बसवा', अशी ओरड सामान्य लोकांकडून अनेकदा केली जाते. मात्र भारतात तसा कोणताही कायदा नसल्यामुळे एकदा निवडून आल्यानंतर बरेचसे लोकप्रतिनिधी पाच वर्षासाठी निर्धास्त होतात. निष्क्रिय असलेले आणि जनेतेची कामे न करणाऱ्या लोकप्रतिनिधींना परत पाठवण्याचा अधिकार जनतेला द्या, अशी मागणी आम आदमी पक्षाचे खासदार राघव चड्ढा यांनी राज्यसभेत केली आहे. 'राईट टू रिकॉल' हे अस्त्र जनतेला मिळावे, अशी मागणी त्यांनी केली.

जनतेला एखाद्याला जसा निवडून देण्याचा अधिकार आहे, तसा त्याला खाली खेचण्याचाही अधिकार असला पाहिजे, असे अर्थसंकल्पीय अधिवेशनात बोलत असताना खासदार राघव चड्ढा म्हणाले.

राईट टू रिकॉल या अधिकाराबाबत बोलताना राघव चड्ढा यांनी सांगितले की, नागरिकांचे सक्षमीकरण करण्यासाठी हे आयुध असणे गरजेचे आहे. या आयुधामुळे राजकीय पक्षांना चांगले आणि जबाबदार उमेदवार द्यावे लागतील. मतदारांना निवडून देण्याचा आणि गरज पडल्यास त्यांना घरी बसवण्याचा अधिकार मिळाल्यास लोकशाही आणखी बळकट होईल.

जगात असे कोणतेही क्षेत्र नाही, जिथे तुम्ही पाच वर्ष काही काम केले नाही तरी टिकून राहू शकता आणि त्याचे परिणामही भोगावे लागत नाहीत, असेही राघव चड्ढा यावेळी म्हणाले.

राईट टू रिकॉल म्हणजे काय?



राघव चड्ढा यांनी राज्यसभेत केलेल्या भाषणाचा व्हिडीओ त्यांच्या एक्स हँडलवर शेअर केला आहे. यावर लिहिलेल्या कॅप्शनमध्ये त्यांनी राईट टू रिकॉलचा अर्थ उलगडून सांगितला. ते म्हणाले, निवडून दिलेले लोकप्रतिनिधी आपले कर्तव्य पार पाडत नसतील तर त्यांना पाच वर्षाची टर्म पूर्ण होण्याआधीच बाजूला करणे म्हणजे राईट टू रिकॉल होय.

जर आपण राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि न्यायाधीशांविरोधात महाभियोग चालवू शकतो. तसेच निवडून आलेल्या सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल करू शकतो, तर मग मतदारांनी निष्क्रिय आमदार आणि खासदारांना पाच वर्षासाठी का सहन करायचे? असा प्रश्न आपचे खासदार राघव चड्ढा यांनी उपस्थित केला.

काम न करणाऱ्या खासदारांना का सहन करायचे? – चड्ढा

राघव चड्ढा म्हणाले की, लोकांनी निवडून दिलेल्या आमदार आणि खासदारांना मध्यावधीत घालवण्याचा कोणताही कायदा आपल्याकडे सध्या नाही. मात्र ते काम करत नसतील तर लोकांनी त्यांना का सहन करायचे. लोकांनी त्यांना पाच वर्ष का सहन करावे? जगातील दोन डझन लोकशाही देशांमध्ये अशाप्रकारची व्यवस्था आहे. यूएस आणि स्वित्झर्लडमध्येही अशा प्रकारचा कायदा असल्याचेही ते म्हणाले.

# शेअर बाजारात घसरण, सेन्सेक्स ५०० अंकांनी कोसळला, गुंतवणूकदारांचे ३ लाख कोटी बुडाले




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय शेअर बाजारात आज (१२ फेब्रुवारी) मोठी घसरण पाहायला मिळाली. गुंतवणूकदारांनी नफा वसूल करण्याचं धोरण स्वीकारल्याने बाजारात घसरण पाहायला मिळाली. सेन्सेक्स ५५९ अंकांच्या घसरणीसह ८३६७४.९२ अंकांवर बंद झाला. तर, निफ्टी ५० निर्देशांक देखील १४७ अंकांच्या घसरणीसह २५८०७ वर बंद झाला. सर्वच क्षेत्रात जोरदार विक्री झाल्याने बाजारावर परिणाम दिसून आला. बीएसई १५० मिडकॅप निर्देशांक ०.४६ टक्क्यांनी घसरला. तर, बीएसई २५० स्मॉल कॅप निर्देशांक ०.८६ टक्क्यांनी घसरला. शेअर बाजारातील घसरणीमुळे बीएसईवर लिस्ट असलेल्या कंपन्यांचे बाजारमूल्य कमी झाले. बुधवारी बीएसईवरील कंपन्यांचे बाजारमूल्य ४७५ लाख कोटी रुपये होते, आज ते तीन लाख कोटींनी कमी होऊन ४७२ लाख कोटींवर आले. म्हणजेच गुंतवणूकदारांचे ३ लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले.

भारतीय शेअर बाजारातील घसरणीचं प्रमुख कारण आयटी स्टॉक्सची जोरदार विक्री हे आहे. एआय क्षेत्रातील अपडेटस मुळं आयटी स्टॉक्सला धक्का बसला. याशिवाय डॉलर निर्देशांक देखील मजबूत झाल्यानं त्याचा नकारात्मक परिणाम दिसून आला.

अमेरिकन शेअर बाजारात आयटी शेअरमध्ये झालेल्या घसरणीमुळे भारतीय शेअर बाजारात देखील आयटी कंपन्यांचे स्टॉक्स घसरले. अमेरिकेत व्याज दरातील कपातीची शक्यता कमी असल्याने गुंतवणूकदार नफा वसूल करत आहेत.

निफ्टी ५० निर्देशांकावर सर्वाधिक वाढ बजाज फायनान्स, श्रीराम फायनान्स, आयशर मोटर्सच्या शेअरमध्ये दिसून आली. तर, निफ्टी ५० वर सर्वाधिक फटका टेक महिंद्रा, इन्फोसिस,टीसीएस,एचसीएल टेक्नोलॉजीज, विप्रोच्या शेअरला बसला. निफ्टी ५० मधील ३० स्टॉक्स घसरणीमुळे बंद झाले.

कच्च्या तेलाच्या दरात वाढ झाल्याने शेअर बाजारावर त्याचा परिणाम झाला. आंतरराष्ट्रायी बाजारात गुरुवारी ब्रेंट क्रूड ऑईलचा दर ०.४६ टक्क्यांनी वाढून ४९.७२ डॉलर प्रति बॅरल झाला आहे. अमेरिका आणि इराण यांच्यातील वाढत्या तणावामुळं तेलाच्या दरात वाढ झाली. भारतासारख्या तेल आयातदार देशाला क्रूड ऑईलच्या दरातील वाढ परवडणारी नसते.

जागतिक शेअर बाजारांमधून देखील कोणताही आधार भारतीय शेअर बाजाराला मिळाला नाही. आशियाई बाजार कमजोर राहिले. तर, हाँगकाँगचा हैंग सेंग निर्देशांक कमजोर राहिला. याशिवाय अमेरिकन शेअर बाजार बुधवारी घसरणीसह बंद झाले होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्रीलंकेत भाग्यश्री वर्तक यांना ‘सोशल एक्सलन्स इंटरनॅशनल अवॉर्ड’

## ३३ वर्षांच्या सेवाभावी कार्याला आंतरराष्ट्रीय गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : कर्णबधिर, दिव्यांग व आदिवासी समाजासाठी गेली तीन दशके अहोरात्र कार्य करणाऱ्या भाग्यश्री राजेंद्र वर्तक यांना नुकताच सोशल एक्सलन्स इंटरनॅशनल अवॉर्ड प्रदान करण्यात आला. हा भव्य आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळा श्रीलंका, कोलंबो येथील स्वामी विवेकानंद कल्चरल सेंटर हाय कमिशन ऑफ इंडिया येथे पार पडला. हा सन्मान म्हणजे त्यांच्या ३३ वर्षांच्या समर्पित सामाजिक, शैक्षणिक व दिव्यांग सक्षमीकरणाच्या कार्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील गौरव आहे. भाग्यश्री वर्तक या २०२४ मध्ये मुख्याध्यापिका पदावरून निवृत्त झाल्या असल्या तरी कर्णबधिर मुले व आदिवासी समाजासाठीचे त्यांचे कार्य आजही अविरत सुरू आहे.

त्या ‘शुभ्रा प्रकल्प’ या उपक्रमाच्या संस्थापिका असून, आतापर्यंत त्यांनी शेकडो कर्णबधिर व आदिवासी व्यक्तींना खेळणी, टोप्या, वह्या, स्कूल बॅग, युनिफॉर्म व दिवाळी फराळ अशा स्वरूपात मदत केली आहे. दिव्यांगांचे सक्षमीकरण, रोजगार निर्मिती व सर्वसमावेशक शिक्षणासाठी त्या सातत्याने कार्यरत आहेत. भाग्यश्री वर्तक यांनी टोटल कम्युनिकेशन पद्धतीद्वारे शेकडो दिव्यांग शाळांतील शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे.




त्या जंग नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पीच अँड हिअरिंग डिसबिलिटीज येथे अतिथी व्याख्याता म्हणूनही कार्य करतात.

न्यायालयीन प्रक्रिया, तपास यंत्रणा व कायदा अंमलबजावणी संस्थांसाठी त्यांनी सांकेतिक भाषा दुभाषी म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, त्यामध्ये मुंबई पोलीस व सीआयडी यांचा समावेश आहे. तसेच दिव्यांग मंत्रालयाच्या उद्घाटन प्रसंगी त्यांनी माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या भाषणांचे सांकेतिक भाषेत भाषांतर करून कर्णबधिर व्यक्तींना समजावले होते. त्या दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्ड ऑफ इंडियाच्या महाराष्ट्र अध्यक्षा असून, स्टँडिंग डिसेबल्ड मुला-मुलींच्या प्रगतीसाठी सक्रिय आहेत. तसेच राष्ट्रीय दिव्यांग ट्रॉफीसाठी त्यांची दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्ड ऑफ इंडियाच्या जॉइंट सेक्रेटरी या पदावर निवड झाली आहे.

याशिवाय त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या महाराष्ट्र दिव्यांग शाखेच्या अध्यक्षा म्हणूनही कार्यरत असून, दिव्यांगांच्या कौशल्य विकास, प्रशिक्षण व रोजगार निर्मितीवर विशेष लक्ष केंद्रित करत आहेत. त्यांचे सर्वात उल्लेखनीय कार्य म्हणजे सायलेंट इंडियन नॅशनल अँथम. कर्णबधिर व्यक्तींनी सादर केलेल्या या राष्ट्रगीताच्या त्या प्रमुख सहाय्यक होत्या. या उपक्रमाला कान्स फेस्टिव्हलमध्ये तीन पदके मिळाली असून, त्यांनी आजवर ४०० ते ५०० कार्यक्रमांत हे राष्ट्रगीत सादर केले आहे. गोवा व दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय परिषदांचे उद्घाटनही या राष्ट्रगीताने झाले आहे.

तसेच त्यांनी स्पेशल ऑलिंपिक भारतसाठी समन्वयक म्हणून काम केले असून, बौद्धिक अक्षम मुलांसाठी गीत व जिंगल तयार केले आहे. निवडणूक प्रक्रियेत दिव्यांगांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठीही त्यांनी विशेष गीत लिहिले आहे. हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळा डी. एस. राठोड फाउंडेशन, मार्शल योगा अकॅडमी व सर्किट बेंच फाउंडेशन संचलित इंडियन पोलीस मित्र भारत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामुळे भारत-श्रीलंका मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ होत असून, भारतीय सेवाभावी कार्याला जागतिक स्तरावर मान्यता मिळाल्याचे आयोजक सुरेश राठोड व डॉ. संजय गिरी यांनी नमूद केले.

# महाराष्ट्र राज्य शासकीय रुग्ण वाहिका चालक करणार चक्का जाम आंदोलन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य शासकीय रुग्णवाहिका चालक कर्मचारी संघटना यांच्याकडून चक्का जाम आंदोलन करणार असे निवेदन देण्यात आले.२००५पासून आज पर्यंत विना खंड अल्प मानधणावर काम करून उदरनिर्वाह भागवावा लागत असल्यामुळे रुग्ण वाहिका चालकांवर उपासमारीची वेळ आली आहे. या मुळे राज्यातील जवळपास ३हजार रुग्ण वाहिका चालक काम बंद करून चक्का जाम आंदोलन करणार असल्याचे समजले आहे. अल्प मानधनावर २४ तास मुख्यालयास उपस्थित राहून स्वतःच्या जीवाची पर्वा न करता स्वतःच्या परिवाराला सोडून ऊन वारा पाऊस थंडी अशी कुठलीही तमा न बाळगता नोकरीच्या अमिषापोटी रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा असे मानून रुग्ण वाहिका चालक अत्यावश्यक सेवा प्रामाणिकपणे देत आहेत. असे असताना ही त्यांच्यावर अन्याय होताना दिसत आहे. अत्यावश्यक सेवा देत असताना अनेकांचे प्राण वाचवण्यात रुग्ण वाहिका चालकांचा सिंहाचा वाटा आहे.रुग्ण कल्याण समितीमधून रुग्ण चालकांना नियुक्ती देऊन त्यांच्याकडून रात्रंदिवस मुख्यालयात शासकीय निवासस्थान देऊन त्यांच्याकडून काम करून घेत आहेत. या विषयी पत्रव्यवहार करून पण यांचा विचार केला गेला नाही. आकृतिबंध आराखड्यामध्ये रुग्णावाहीका चालकाचे पद मान्य असताना देखील गेली अनेक वर्षापासून या पदाचा रुग्ण वाहिका चालकांना अद्याप ही लाभ मिळाला नसल्याने शेवटचा पर्याय म्हणून रुग्णावाहीका चालकांनी काम बंद करून चक्का जाम आंदोलनचा पर्याय निवडला असे चित्र स्पष्ट होत आहे.

# सहाय्यक पोलीस निरीक्षक भाऊसाहेब गोसावी यांची अखेर बदली : जनोक्रोशानंतर कारवाई

**पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे आशिष दिलीप कांबळे यांची नियुक्ती**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वेळापूर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेली सहाय्यक पोलीस निरीक्षक भाऊसाहेब गोसावी यांची अखेर बदली करण्यात आली.

काही नाही महिन्यापासून त्यांचे विविध प्रकरणामुळे ते सातत्याने केंद्रस्थानी होते. विधानसभेच्या अधिवेशनामध्ये उत्तमराव जानकर यांनी त्यांच्या कार्यपद्धतीवर मोठ्या प्रमाणात आक्षेप घेतले होते.

सात फेब्रुवारी २०२६ रोजी मतदानासाठी जात असताना मनोज सुपे या युवकाच्या त्याच्या आईसमोर त्यांना मारहाण करण्यात आली. महाराणी प्रकरणामुळे त्यांच्यावर अनेक अक्षरी होऊ लागल्यावर त्यांच्यावर अनेक अडचणीमध्ये वाढ होत गेली.

या घटनेच्या निषेधार्थ खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तम जानकर यांनी वेळापूर पोलीस स्टेशन समोर जन आंदोलन उभे केले होते. या आंदोलनामध्ये शेकडो युवकांनी सहभाग घेतला होता. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. व त्यांची तात्काळ बदले ही करण्यात आली. व त्यांच्या जागेवर पंढरपूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री आशिष दिलीप कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली.

# सांगलीत राष्ट्रवादीचा डंका; नागेश फाटे यांच्याकडून जयंतराव पाटील यांचा ‘पंढरीच्या’ तुळशीहाराने सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इस्लामपूर : नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सांगली जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (शरदचंद्र पवार गट) अभूतपूर्व यश संपादन केले आहे. या विजयाचे शिल्पकार आणि पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांचे अभिनंदन करण्यासाठी उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी आज इस्लामपूर येथे त्यांची भेट घेतली.यावेळी नागेश फाटे यांनी जयंतराव पाटील यांचा श्री भगवंत पांडुरंगाचा आशीर्वाद मानल्या जाणाऱ्या पवित्र तुळशीच्या हाराने सत्कार करून त्यांना विजयाच्या शुभेच्छा दिल्या.



केवळ सत्कारच नव्हे, तर या विजयाची ऊर्जा ज्या विचारांतून मिळाली, त्या सहकारमहर्षी स्व. राजाराम बापू पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास नागेश फाटे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. हा विजय बापूंच्या विचारांचा आणि जयंतराव पाटील यांच्या सक्षम नेतृत्वाचा विजय आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

या विजयामुळे सांगली जिल्ह्यात पक्षाची पकड अधिक मजबूत झाली असून, उद्योग व व्यापार विभागातही आनंदाचे वातावरण आहे. नागेश फाटे यांच्या या भेटीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून आगामी काळात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यावर भर दिला जाणार असल्याचे समजते.

ह्या वेळी राष्ट्रवादी सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, उद्योजक नवनाथ बचूटे व अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# कर्मवीर आण्णासाहेब मुरकुटे यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा : प्राचार्य नितीन भामरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : घोटी येथील जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज तसेच अभिनव बाल मंदिरमध्ये मविप्र संस्थेचे कर्मवीर आण्णासाहेब मुरकुटे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली . मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तालुका संचालक ड. संदीप भाऊ गुळवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.




अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य नितीन भामरे होते. व्यासपीठावर उपमुख्याध्यापक उल्हास पवार, पर्यवेक्षक हिरामण चौधरी, अविनाश निकम, हेमंत झोले, नामदेव सरगर, अपर्णा उईके, देवयानी जगताप, कैलास पाचोरे, सोमनाथ गिरी, वरिष्ठ लिपिक जीवन शिंदे आदी उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते कर्मवीर अण्णासाहेब मुरकुटे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी बोलतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष व विद्यालयाचे प्राचार्य नितीन भामरे म्हणाले की, कर्मवीर मुरकुटे यांनी मविप्र संस्थेसाठी अतिशय मोलाचे योगदान दिलेले आहे. त्यांच्या दुरदृष्टीमुळे अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली .त्यांचे शेतीविषयक, सामाजिक, सहकार, राजकीय, शैक्षणिक आदींसह सर्वच क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय असून त्यांच्या कार्याचा इतरांनी आदर्श घ्यावा असे आव्हान प्राचार्य भामरे यांनी केले.

यावेळी सत्येंनं जाधव, श्रीमती. एस.ई. पवार, सविता जाधव, संपत शेंगाळ, राजेंद्र देवगिरे, गायत्री सूर्यवंशी, घनश्याम भालेराव,प्रकाश तांबे, अनिल काळे आदींसह शिक्षक,शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

# सांगवी काटी येथे सत्कार टाळून शैक्षणिक साहित्य वाटप




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तुळजापूर/प्रतिनिधी : सांगवी काटी, ता. तुळजापूर येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये तामलवाडी पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सदस्या सौ. संगिता जगन्नाथ गवळी यांच्या निवडीबद्दल शैक्षणिक साहित्य (वह्या व पेन) वाटप करण्यात आले.

नवनियुक्त सदस्या गवळी यांनी सर्व मित्र परिवाराला सत्कार नको तर सेवेची संधी द्या व हार फेटे नको तर वही-पेन द्या असे भावनिक आवाहन केले होते. या आवाहनाला प्रतिसाद देत मगर सांगवी येथील मित्र परिवाराच्या वतीने वह्या व पेन शिवसेना तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी व मुख्याध्यापक यांच्या हस्ते जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करत मा. मुख्याध्यापक यांच्या वतीने या उपक्रमाचे स्वागत केले. राजकीय व पक्षीय विरोध बाजूला ठेऊन विकासासाठी सर्वजण एकत्र येण्याचे आवाहन यावेळी तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी यांनी उपस्थित नागरिकांना केले.

यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख जगन्नाथ गवळी यांच्यासह सांगवी काटी चे सरपंच अमोल पाटील, अप्पासाहेब मगर, रामा मगर, लक्ष्मण मगर, सतीश शेळके, शामराव मगर, कालिदास मगर, मधुकर मगर, बाबुराव मगर, शेषेराव मंडुळे, साधू शिंदे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## पं. स. सदस्या गवळी यांच्या आवाहनाला नागरिकांचा प्रतिसाद

**रविवार, १५ फेब्रुवारीपासून कार्यक्रम**

**तीन दिवसीय कार्यक्रमात भजन, दर्शन सोहळा व महाप्रसादाचे आयोजन**

# महाशिवरात्रीनिमित्त श्री रेवणसिद्धेश्वर मल्लिनाथ देवस्थान येथे विविध धार्मिक, सामाजिक व देशभक्ती कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महाराष्ट कर्नाटक सीमेवरील आळंद तालुक्यातील निरगुडी येथे सर्व धर्मियांचे श्रद्धास्थान जागृत श्री रेवणसिद्धेश्वर मल्लिनाथ देवस्थान महाशिवरात्र यात्रा महोत्सव निमित्य रविवार दि. १५ पासून देशभरातील लाखो भाविकांच्या उपस्थित विविध धार्मिक सामाजिक व देशभक्ती कार्यक्रम आयोजित केली आहे.

जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सद्गुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात प्रत्येक महाशिवरात्र यात्रेस निरगुडी येथे महाराष्ट्र,कर्नाटक, तेलंगणा,गुजरात राजस्थान अशा विविध राज्यातून लाखो भाविक भक्त या ठिकाणी मोठी गर्दी करतात. यंदा यात्रा कमिटीचे वतीनेयात्रेची जयत्त तयारी करण्यात आले असून बैल, खोंड, गाई सह अनेक जनावराचे गड्डा यात्रा भरविण्यात आला आहे. रविवार दि.१५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री दिवशी देशभक्तीसह भजन भारूड कीर्तन आदी भरगच्च कार्यक्रम आयोजित केला आहे. रात्री ८ वाजता निरगुडी येथील वें.कै.शंकरय्या स्वामी यांच्या घरातून श्री रेवणसिदेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यंत श्री चे पालखी,नंदिध्वजचे पुरवंतसह विविध वाद्यसमवेत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. सोमवार दि.१६ फेब्रुवारी रोजी पहाटे ५ वाजता श्री चे रुद्राभिषेक पूजा, अग्नी पूजा, या नंतर दिवसभर सर्व धर्माचा आणि सर्व पक्षाचा प्रमुख उपस्थिती धर्मसभा कार्यक्रम होणार आहे . दुपारी ४ वाजता श्रीचे रथोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. दि.१५, १६ व १७ फेब्रुवारी रोजी देशभक्ती गीत गायन भजन सह श्रीचे दर्शन सोहळा कार्यक्रम होणार असून या काळात दिवस रात्र महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आला आहे.

**शिवभक्तांनी आपले जिवन सार्थक करून शिवभक्तीतुन देशभक्ती मार्गाकडे वळावे, म्हणून श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराजानी कर्नाटका, गुजरात,आंध्रा आणि महाराष्ट्र अशा अनेक राज्यासह संपूर्ण देशभरात जय भारतमातासेवा समितीची शाखा स्थापना केली असून सुमारे साडेसहा हजारोहून अधिक शिवलिंग देवस्थानाची उभारणी केली आहेत.देशभरातील लाखो भाविक भक्त निरगुडी येथील शिवरात्री यात्रा महोत्सव साठी मोठया संख्याने आवर्जून उपस्थित राहतात.**



# बांगलादेशी फेरीवाले विरोधात महापौर रितू तावडे आक्रमक, भाजपचे किरीट सोमय्याही बैठकीत हजर

## अतिक्रमणमुक्त, सुरक्षित व शिस्तबद्ध शहर निर्माण करण्यासाठी आम्ही पूर्णतः कटिबद्ध



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
मुंबई/केतन भोज : मुंबई महापालिकेत महापौरपदी विराजमान होताच मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी त्यांच्या पहिल्याच बैठकीत मुंबई शहरात अनधिकृतरित्या घुसखोरी करून राहणाऱ्या बांगलादेशी आणि रोहिंग्यांविरोधात मोहित हाती घेतली आहे. काल मुंबई महापालिका मुख्यालयात याच विषयावर बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. 'सुरक्षित मुंबई, शिस्तबद्ध मुंबई आणि अवैध बांगलादेशी घुसखोरमुक्त मुंबई' घडवणे हिच आहे असे महापौर रितू तावडे यांनी सांगितले.ईशान्य मुंबईचे माजी खासदार किरीट सोमय्या हे मागील अनेक दिवसांपासून बांगलादेशी विरोधात मोहीम चालवत आहेत.मुंबई महानगरपालिका मुख्यालयात झालेल्या बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी संवाद साधताना रितू तावडे यांनी सांगितले की, जेव्हा मी पदग्रहण केले तेव्हाच सांगितले होते की, मुंबईतील अनधिकृत बांगलादेशी फेरीवाले यांच्या विरोधात माझं काम असेल.याचा पाठपुरावा भाजप नेते किरीट सोमय्या सतत करत होते.तसेच पालिकेतर्फे वाटण्यात आलेल्या बोगस जन्म प्रमाणपत्राबाबतही महापौर रितू तावडे यांनी भाष्य केले आहे. मुंबईतील पदपथ आणि रस्ते हे केवळ आणि केवळ करदाते मुंबईकरांच्या हक्काचे आहेत. मुंबईतील अवैध घुसखोरांची ओळख पटवणे, त्यांच्या कागदपत्रांची काटेकोर तपासणी करणे आणि अतिक्रमणमुक्त, सुरक्षित व शिस्तबद्ध शहर निर्माण करण्यासाठी आम्ही पूर्णतः कटिबद्ध आहोत असे यावेळी महापौर रितू तावडे यांनी सांगितले. यावेळी या बैठकीला उपमहापौर संजय घाडी, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या, भाजपा मनपा गटनेते गणेश खणकर तसेच महानगरपालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत ही महत्त्वपूर्ण बैठक पालिका मुख्यालयात पार पडली.

# फार्मर कप प्रशिक्षणासाठी शेतकरी रवाना जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दाखवला बस ला हिरवा झेंडा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
जळगाव : जळगाव तालुक्यातील कृषी विभाग व उमेद अभियानांतर्गत महिला व पुरुष शेतकरी पाणी फाउंडेशनच्या 'फार्मर कप' निवासी प्रशिक्षणासाठी के.व्ही.के. जळगाव जामोद सेंटर, जिल्हा बुलडाणा येथे रवाना झाले. या प्रशिक्षणाचा उद्देश शेतकऱ्यांना जलसंधारण, शाश्वत शेती पद्धती व ग्रामविकास विषयक मार्गदर्शन करणे हा आहे. या प्रसंगी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या बस ला हिरवा झेंडा दाखविण्यात आला. यावेळी प्रोजेक्ट डायरेक्टर श्री. राजू लोखंडे, जिल्हा कृषी अधीक्षक कुरबान तडवी, उपविभागीय कृषी अधिकारी श्रीमती देसले, कृषी अधिकारी स्नेहल थेऊरकर, बीडीओ चंद्रकांत बोडरे, उमेद तालुका अभियान व्यवस्थापक देवेंद्र सुर्यवंशी तसेच पाणी फाउंडेशनचे विभागीय समन्वयक प्रल्हाद आरसुळे, उपविभागीय समन्वयक सुहास मोहिते, प्रियंका बैसाणे व तेजस निकुंभ आदी उपस्थित होते.

# प्रथम वर्ष इंजिनिअरिंग, बी.फार्मसी आणि एमबीए प्रवेशासाठी आवश्यक 'सीईटी २०२६' करिता ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी मुदतवाढ




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर : शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रथम वर्ष इंजिनिअरिंग, बी.फार्मसी आणि एम.बी.ए.ला प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेल्या व राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी सेल), मुंबई यांच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'सीईटी २०२६' या परीक्षेकरिता ऑनलाईन फॉर्म भरण्याची प्रक्रियेला आता आणखी सात दिवसाची मुदतवाढ दिली असून आता विद्यार्थ्यांना शुक्रवार, दि.१३ फेब्रुवारी २०२६ पासून ते शुक्रवार, दि.२० फेब्रुवारी २०२६ पर्यंत फॉर्म भरता येणार आहे.' अशी माहिती स्वेरीचे संस्थापक

**दि. २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत चालणार ही प्रक्रिया**

व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांनी दिली.

पदवी अभियांत्रिकी, पदवी फार्मसी आणि पदव्युत्तर पदवी असलेल्या एम.बी.ए.च्या प्रवेशाकरीता अत्यंत महत्वपूर्ण समजल्या जाणार्या 'एमएएच-सीईटी २०२६' या परीक्षेसाठी फॉर्म भरण्याची मुदत शासनाने दि.१० जानेवारी २०२६ पासून ते गुरुवार, दि. १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत दिली होती. परंतु दिलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांचे फॉर्म भरण्यासाठी काही कागदपत्रे अपुरी होती त्यामुळे त्यांना फॉर्म भरता आला नाही. अशा विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासनाने यासाठी आणखी सात दिवसांची मुदतवाढ दिली आहे. आता शुक्रवार, दि.१३ फेब्रुवारी २०२६ पासून ते शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत ही प्रक्रिया सुरु राहणार आहे. सदर फॉर्म भरण्याची मोफत सुविधा स्वेरी मध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचा इच्छुक विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा. शासनाने यंदा नियमात बदल केले असून 'सीईटी २०२६' या परीक्षेत पहिल्या प्रयत्नात कमी पर्सेंटाईल मिळाले असतील तर त्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून तो विद्यार्थी आणखी एकदा परीक्षा देवू शकतो. या दोन्ही परीक्षेत ज्या परीक्षेत जास्त पर्सेंटाईल मिळाले असतील त्या परीक्षेच्या गुणपत्रिकेचा लाभ विद्यार्थ्याला प्रवेश प्रक्रियेवेळी घेता येईल म्हणजेच ही 'सीईटी २०२६' परीक्षा दोन वेळी देता येवू शकते. या दोन्ही परीक्षेसाठी शासनाकडून शुल्क देखील आकारले जाणार आहे. विद्यार्थ्यांनी सदर फॉर्म भरण्यासाठी येताना आपल्या प्रवर्गानुसार आवश्यक असणारी फी आणि आवश्यक ती कागदपत्रे सोबत आणावी. हे शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरायचे आहे. सीईटी फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थ्यांना स्वतःचा अपार आयडी तयार करून ठेवावा लागेल, तसेच आधार कार्ड, आयडेंटी आकाराचा रंगीत फोटो, एटीएम कार्ड अथवा ऑनलाईन बँकिंगचा लॉगीन आयडी आणि त्याचा पासवर्ड, ओटीपी करिता मोबाईल या महत्वाच्या बाबी आवश्यक असणार आहेत. याबाबत शासनाच्या संकेतस्थळावर अधिक माहिती उपलब्ध आहे. अधिक माहितीसाठी प्रा.उत्तम अनुसे (मोबा.-९१६८६५५३६५), बी. फार्मसीसाठी प्रा. आर.एस. नाईकनवरे (मोबा.-८९९९९७३६२५) तर एम.बी.ए. संदर्भात प्रा. सागर सरीक (मोबा. नंबर-९८९०४१९०४९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# महापौर विनायक कोंड्याल आ. देशमुख यांच्या घेतली सदिच्छा भेट





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
पंढरपूर प्रतिनिधी : सोलापूर महानगरपालिकेचे नूतन महापौर विनायक कोंड्याल यांनी सोलापूर शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांची सदिच्छा भेट घेतली व याप्रसंगी आमदार विजयकुमार देशमुख यांनी महापौर विनायक कोंड्याल यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आले.

यावेळी शहराच्या विकासासंदर्भात विविध विषयावर सकारात्मक चर्चा करण्यात आली. सोलापूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी महानगरपालिका राज्य शासन यांच्यात समन्वय ठेवून काम करण्याची गरज असल्याचे मत दोन्ही मान्यवरांनी व्यक्त केले.

बेटी प्रसंगी नगरसेवक संजय कोळी, नगरसेवक शिवानंद पाटील, नगरसेवक अविनाश पाटील, नगरसेवक राजकुमार पाटील, नगरसेवक अमर पुदाले, अधिक मान्यवर नगरसेवक उपस्थित होते.

# हितेंद्र नंदेश्वर यांनी रमाबाई आंबेडकर यांची प्रतिमा नंगपुरामुर्री ग्रामपंचायतला भेट दिली






**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
गोंदिया : जवळील नंगपुरामुर्री येथील रहिवासी व सामाजिक कार्यकर्ते हितेंद्र नंदेश्वर (सेनि.कोतवाल) यांनी ग्राम पंचायत कार्यालय येथे माता रमाबाई आंबेडकर यांची भेट दिली. त्याप्रसंगी सरपंच श्रीमती कवितालाई लिचडे, योगेश शरणागत यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडले त्याप्रसंगी ग्रायसदस्य संगिता भांडारकर, पारमादुरकर, डॉ. शिष्या रहांगडाले, आशा सुपरवाईज मनिषा कटरे मारुरकर, ग्रामपंचायत कर्मचारी तारा राऊत, संगणक चालक आरती कटरे, रिना नांदगाये, सपना साखरे आदी उपस्थित होते.

हितेंद्र नंदेश्वर हे कोतवाल पेशातून सेवानिवृत्त झाले. ते अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात सक्रिय असतात. कमाईचा विसावा भाग हा सामाजिक कार्यात खर्च करावा असे बोलल्या जाते. हितेंद्र नंदेश्वर हे अनेक सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आहेत. नेहमी सामाजिक कार्यात स्वतःला वाहून घेतात.

**महिन्यापूर्वी श्वानदंशामुळे चिमुरड्याचा रेबीजने झाला होता मृत्यू; प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नागरिकांचा संताप**

# पडघे परिसरात भटक्या कुत्र्यांची दहशत; लहान मुलांसह नागरिकांवर हल्ल्यांच्या घटना वाढल्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :
भिवंडी तालुक्यातील पडघे परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लहान मुलांसह अनेक नागरिकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना सातत्याने घडत असून, नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर भटक्या कुत्र्यांवर नियंत्रण आणण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.महिन्यांपूर्वी पडघे परिसरातील बोरीवली, खलील कॉलनी येथे घराबाहेर खेळत असताना एका चिमुरड्याला भटक्या कुत्र्याने चावा घेतला होता. या घटनेनंतर उपचार सुरू असतानाच राहील रियाज शेख (वय ४ वर्षे) या निष्पाप चिमुरड्याचा रेबीजमुळे मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. पडघा परिसरात बिल्डिंग परिसर, कचरापेट्या, बाजारपेठ आणि गल्लीबोळांमध्ये मोठ्या प्रमाणात भटकी कुत्री फिरताना दिसत आहेत. ही कुत्री समूहाने फिरत असून, रात्री-अपरात्री वाहनचालकांच्या मागे धाव घेतात आणि अनेकदा चावा घेतात. तसेच पदपथावरून जाणाऱ्या लहान मुलांवर आणि ज्येष्ठ नागरिकांवर हल्ला केल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. ग्रामीण भागातही भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढत असून, भरदिवसा देखील नागरिकांना बाहेर पडणे कठीण झाले आहे. विशेषतः शाळकरी मुले आणि लहान चिमुरड्यांच्या सुरक्षेबाबत पालकांमध्ये चिंता वाढली आहे.

**काही महिन्यांपूर्वी माझ्या मुलाला कुत्रा चावल्याने त्याचा मृत्यू झाला. त्यामुळे शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन इतरांचे जीव वाचवावेत,**
**-रियाज शेख ,बोरीवली**

भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. दरम्यान, बोरीवली ग्रामपंचायतीने भटक्या आणि पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी भिवंडी महानगरपालिका, पडघा पोलीस ठाणे आणि वनविभागाकडे निवेदन दिले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाच्या निष्क्रियतेबद्दल नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असता, कुत्रा चावल्याच्या घटनांची अधिकृत आकडेवारी मिळू शकली नाही. त्यामुळे परिसरातील श्वानदंशाच्या घटनांचे नेमके प्रमाण स्पष्ट होऊ शकलेले नाही.दरम्यान, पडघा परिसरातील नागरिकांनी भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**मला कुत्रा चावल्यानंतर सायन रुग्णालयात १५ दिवस उपचार घ्यावे लागले. माझी प्रकृती अत्यंत चिंताजनक होती. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहणे आवश्यक आहे**
**- विश्वनाथ सोष्टे ,कुरुंद**